महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
जनसंपर्क विभाग : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
'प्रकाशगड', प्लॉट क्र. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, ४ था मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
संकेतस्थळ : www.mahadiscom.in दूरध्वनी : ०२२-६९८५२२०० ईमेल-prodiscomm@gmail.com
टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३४३५, १८००-२१२-३४३५, १९१२, १९१२०

प्रेसनोट - दि. 13 मे 2026 (इंग्रजी व मराठी)

राज्यातील ९९ टक्के वीज ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज नाही

मुंबई, दि. १३ मे २०२६: राज्यातील छतावरील सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या सरसकट सर्व वीज ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज हा अधिभार द्यावा लागणार असल्याचे चित्र काही हितसंबंधी गटांकडून निर्माण केले जात असून ते पूर्णपणे चुकीचे आहे. राज्यामध्ये महावितरणचे एकूण ३ कोटी १७ लाख वीज ग्राहक असून त्यापैकी ४४,२४६ ग्राहकांना म्हणजे एकूण ग्राहकांपैकी एक टक्क्यापेक्षा कमी अर्थात केवळ ०.१४ टक्के वीज ग्राहकांना हा अधिभार लागू झाला आहे, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली.

ज्या ग्राहकांचा मंजूर भार १० किलोवॅटपेक्षा अधिक आहे व ज्यांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविला आहे त्यांना त्यांनी निर्माण केलेल्या विजेवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करावा, असा आदेश महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिला आहे. त्यानुसार महावितरणने संबंधित वीज ग्राहकांना हा अधिभार लागू केला आहे.

राज्यात महावितरणचे २ कोटी ३७ लाख घरगुती वीज ग्राहक आहेत. त्यापैकी ६ लाख ५७ हजार घरगुती वीज ग्राहकांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविले आहेत. आयोगाच्या आदेशानुसार सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या एकूण घरगुती ग्राहकांपैकी १६,४१० म्हणजे केवळ २.४९ टक्के घरगुती ग्राहकांनाच ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे. सर्व २ कोटी ३७ लाख ग्राहकांशी तुलना केली तर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झालेल्या घरगुती ग्राहकांचे प्रमाण केवळ ०.०७ टक्के आहे.

राज्यात एकूण ४ लाख ४५ हजार औद्योगिक (उच्चदाब व लघुदाब) वीज ग्राहक असून त्यापैकी केवळ ८,८९४ ग्राहकांना म्हणजे सुमारे २ टक्के ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झालेला आहे. त्याचप्रमाणे महावितरणच्या एकूण २३ लाख ३० हजार व्यावसायिक वीजग्राहकांपैकी १२,८३२ ग्राहकांना म्हणजे ०.५५ टक्के व्यावसायिक ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने २०१९ साली छतावरील सौरऊर्जा निर्मिती करणाऱ्या वीजग्राहकांवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करण्याचा निर्णय दिला होता. त्यावेळी आयोगाने छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्पांची राज्यातील एकूण क्षमता २ हजार मेगावॅट झाल्यावर हा चार्ज लागू करण्याचा आदेश दिला होता. आयोगाने २०२३ मध्ये ही मर्यादा ५ हजार मेगावॅट केली. या वर्षाच्या सुरुवातीला राज्याने ५ हजार मेगावॅटची क्षमता ओलांडल्यानंतर आयोगाने २५ मार्च २०२६ च्या वीजदर आदेशात ग्रीड सपोर्ट चार्ज निश्चित केला.

सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या ग्राहकांना १२९ कोटींचा लाभ - छतावरील सौरऊर्जा प्रकल्प बसविलेले जे ग्राहक अतिरिक्त वीज महावितरणला देतात त्यांना त्याबद्दल लाभ मिळतो. राज्यातील ४ लाख ९० हजार

वीजग्राहकांना या प्रकारे गेल्या वर्षभरात १२९ कोटी ५७ लाख रुपयांचा लाभ मिळाला आहे. त्यामध्ये ४ लाख ७२ हजार घरगुती ग्राहकांचा समावेश आहे व त्यांना १२४ कोटी ५५ लाख रुपयांचा लाभ झाला आहे.

No Grid Support Charge for 99% of Electricity Consumers in the State

Mumbai, 13 May 2026: Certain vested interest groups are creating a misleading impression that all electricity consumers in the state who have installed rooftop solar power projects will be required to pay a 'Grid Support Charge'(GSC) but this portrayal is entirely incorrect. Mahavitaran has clarified that the state has a total of 3 crore 17 lakh electricity consumers; of these, the surcharge has been applied to only 44,246 consumers–representing less than one percent of the total consumer base, or specifically, just 0.14 percent.

The Maharashtra Electricity Regulatory Commission (MERC) has issued an order mandating that a Grid Support Charge be applied to the electricity generated by consumers who have installed rooftop solar power generation projects and whose sanctioned load exceeds 10 kilowatt. Accordingly, Mahavitaran has implemented this surcharge for the relevant electricity consumers.

The state has 2 crore 37 lakh domestic electricity consumers served by Mahavitaran. Of these, 6,57,000 domestic consumers have installed rooftop solar power generation projects. In accordance with the Commission's order, the Grid Support Charge has been applied to only 16,410 of these solar-equipped domestic consumers–constituting merely 2.49 percent of that specific group. When compared against the entire domestic consumer base of 2 crore 37 lakh, the proportion of domestic consumers subject to the Grid Support Charge stands at a mere 0.07 percent.

The state has a total of 4,45,000 industrial electricity consumers (covering both High Tension and Low Tension categories); of these, the Grid Support Charge has been applied to only 8,894 consumers–approximately 2 percent of the industrial base. Similarly, out of Mahavitaran's total 23 lakh 30 thousand commercial electricity consumers, the Grid Support Charge has been applied to 12,832 consumers–representing 0.55 percent of the commercial consumer base.

The Maharashtra Electricity Regulatory Commission had issued a decision in 2019 to levy a Grid Support Charge on electricity consumers engaged in rooftop solar power generation. At that time, the Commission had ordered that this charge be implemented once the total capacity of rooftop solar power generation projects in the state reached 2,000 MW. In 2023, the Commission raised this limit to 5,000 MW. After the state surpassed the 5,000 MW capacity mark earlier this year, the Commission fixed the Grid Support Charge in its tariff order dated March 25, 2026.

RTS Consumers get benefits of Rs. 129 Cr - Electricity consumers who have installed roof top solar schemes and who send excess power to Mahavitaran grid get benefits for the same. In last one year, 4.90 lakh power consumers in the state have got benefits of Rs. 129.57 Cr. Amongst them are 4.72 lakh domestic consumers who got benefits of Rs. 124.55 Cr.
